Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P092
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# मुलींच्या शिक्षणासाठी गोंड जमातीत असलेले परंपरागत मूल्यांचे अध्ययन

**डॉ. अशोक बोरकर**
समाजशास्त्र विभागप्रमुख
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर

**तृप्ती मार्गेश गणवीर**
संशोधन अधिछात्रा
रा.तु.म नागपूर विद्यापीठ, नागपूर

**गोषवारा** - गोंड जमात ही भारतातील एक प्रमुख आदिवासी जमात असून तिच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरांना एक विशेष महत्त्व आहे. गोंड समाजात शिक्षण हे केवळ शालेय क्षणापुरते मर्यादित नसून जीवनमूल्य संस्कार, परंपरा आणि व्यवहारज्ञान यांचा समावेश असलेले व्यापक शिक्षण मानले जाते. विशेषतः मुलींच्या शिक्षणाबाबत गोंड समाजात काही परंपरागत मूल्य दिसून येतात. त्यामध्ये कामकाजातील सहभाग, निसर्गाशी सुसंवाद, वडीलधाऱ्यांचा आदर, लोकगीत, लोकनृत्यांद्वारे शिक्षण तसेच "गोटूल" सारख्या सामूहिक संस्थांमधून मिळणारे सामाजिक शिक्षण या मूल्यांचा समावेश होतो.

गोंड समाजातील पारंपारिक शिक्षण पद्धतीत मुलींना स्वावलंबन सहकार्य, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचे बोध दिले जातात. या मूल्यांमुळे त्या घरगुती, सामाजिक आणि सांस्कृतिक जबाबदाऱ्या समजून घेतात. आधुनिक शिक्षण प्रणाली पूर्णतः वेगळी आहे तिचे स्वरूप पूर्णतः बदललेले दिसून येते सध्याच्या आधुनिक युगात परंपरागत शिक्षण प्रणाली लागू होत नाही.

या संशोधनात गोंड जमातीत मुलींच्या शिक्षणासाठी संबंधित पारंपरिक मूल्यांचा अभ्यास करण्यात आला असून त्यांचा आजच्या शिक्षण व्यवस्थेशी असलेले संबंध विशद करण्यात आलेला आहे.

**बिजशब्द :-** गोटूल, गोंड समाज, पारंपारिक शिक्षण, आदिवासी महिला, मुलींचे शिक्षण

**प्रस्तावना:-**

परंपरागत मूल्य समाजाच्या अनेक पिढ्यांमधून जपल्या जाणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मानकांचा संच आहे. हे मूल्य समाजाच्या जीवनशैलीला दैनिक व्यवहारांना एकमेकांशी जोडलेल्या संबंधांना आकार देतात जेव्हा एखाद्या समाजाची परंपरा टिकून राहते तेव्हा त्या समाजाची सांस्कृतिक ओळख, एकात्मता आणि ऐक्य दृढ होतो परंपरागत मूल्य केवळ व्यक्तिगत वर्तनावर नाही तर सामाजिक संस्था आणि बहुसंख्य समाजाच्या सह जीवनावर खोलवर परिणाम करतात.

भारतीय समाजामध्ये मूल्यांची प्राचीन परंपरा आहे जी धर्म, संस्कृती, कुटुंब आणि सामाजिक बंधन यांच्यामध्ये दडलेली आहेत. परंपरागत मूल्य सामाजिक आचारसंहिता म्हणून कार्य करतात ज्यामुळे नैतिकतेला मार्गदर्शन मिळते आणि समाजाला स्थैर्य व सुरक्षा प्राप्त होते. मात्र आधुनिकतेच्या प्रभावामुळे या मूल्यांमध्ये बदल घडवून येऊ शकतो त्यामुळे परंपरागत मूल्य आणि नव्या सामाजिक संदर्भाचे संतुलन साधने आवश्यक आहे. शिक्षण हे माणसाचे जीवन यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाशिवाय माणसाला त्याचे जीवन जगणे कठीण आहे. पण ते शिक्षण फक्त पुस्तके वाचूनच मिळणे आवश्यक नाही, शिक्षण हे आपल्या जीवनामधील अनुभवांमधूनही मिळू शकते आजच्या काळात आपण शिक्षणाशिवाय आपल्या जीवनाची कल्पना करू शकत नाही. 'आदिवासी आणि शिक्षण' हे दोन्ही पूर्वीच्या काळात कसे एकत्र आले? आदिवासी जमातीला शिक्षणाचे महत्त्व समजले त्याचे उदाहरण म्हणून आजही आपल्याला जगातील सर्वात जुन्या शिक्षण प्रणाली पैकी एक असलेल्या गोंड आदिवासी समुदायात गोटूल प्रणाली पाहायला मिळते. गोंड आदिवासी समुदायात गोटूलची उपस्थिती आदिवासी समुदाय शिक्षण व्यवस्थेला महत्त्व देतो.

**दुर्खीमच्या** सिद्धांतानुसार, "परंपरागत मूल्य समाजाच्या नैतिक आधाराचे प्रतीक असून प्रत्येक व्यक्ती आणि समाजाला एकत्र ठेवणारे महत्त्वाचे घटक आहेत". (Durkheim, 1956) आदिवासी महिलांचे पारंपारिक शिक्षण फक्त ज्ञानाचे साधन नाही तर समाजाच्या सामाजिक सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांची साधने आहेत हे शिक्षण समाजातील एकात्मता टिकवते आणि समुदायातील परस्परावलंबन वाढवते व पिढ्यानपिढ्या परंपरा जपण्यास मदत करते. **पिअरे बोदयु** यांच्या सिद्धांतानुसार, "सामाजिक आणि सांस्कृतिक भांडवलामुळे व्यक्तीच्या शिक्षणाच्या संधी आणि सामाजिक स्थितीवर प्रभाव पडतो". (Bourdieu,P.(1984). गोटूल प्रणाली ही गोंड आदिवासींच्या सांस्कृतिक भांडवलाचा भाग असून त्या अंतर्गत त्यांची भाषा, संस्कृती, सामाजिक नियम आणि मूल्य व परंपरा यांचा समावेश होतो. हे भांडवल त्यांच्या समाजशास्त्रीय संरचनेत महत्त्वपूर्ण घटक आहेत. **ॲन ओकले** यांच्या मतानुसार "स्त्रियांच्या शिक्षणावर समाजातील सत्तासंबंध आणि पितृसत्तेचा प्रभाव असतो त्यामुळे शिक्षण हे महिलांनच्या सबलीकरणाच माध्यम बनू शकते".(Oakley,A(1972). आदिवासी समाजातील गोटूल शिक्षण प्रणालीमध्ये मुलींच्या सहभागाला समान स्थान होत. त्यामुळे गोंड समाजातील शिक्षणात स्त्रियांचा

आदर, स्वावलंबन आणि निर्णयक्षमता यांना महत्व दिल जाते. म्हणजेच गोंड समाजातील मुलींचं पारंपारिक शिक्षण हे फक्त ज्ञानप्राप्ती नसून समाजातील स्थैर्य, सांस्कृतिक वारसा आणि स्त्री – पुरुष समानता यांचे जतन करणारे माध्यम आहे.

**पुर्व अध्ययनाचा आढावा**

"Strengthening Tribal Governance: A case Study of the Gotul System in Maharastra, India" (2024) या संशोधनामध्ये Kumare, Swapnil S यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समुदायांमध्ये असणाऱ्या पारंपारिक गोटूल शासन पद्धतीचे संशोधन केलेले असून. हे अध्ययन Galaxy: International Multidisciplinary Research Journal यामध्ये प्रकाशित झालेले आहे. हा पेपर महाराष्ट्रातील आदिवासी समुदायांद्वारे पाळल्या जाणाऱ्या पारंपारिक गोटुल शासन पद्धतीचे परीक्षण करतो. गोटूल ही एक सामुदायिक संस्था आहे जिथे आदिवासी तरुणांना शिक्षित केले जाते आणि जमातीमधील नियम, मुल्ये आणि शासन पद्धतींचे सामाजीकरण केले जाते. आदिवासी समुदायांना त्यांच्या पारंपारिक शासन संरचना आणि पद्धती टिकवून ठेवण्यात मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागले आहे. सरकारी धोरणे आणि विकास कार्यक्रम अनेकदा या पारंपारिक संस्थांना कमकुवत करतात किंवा पुरेसे एकत्रित करण्यात अयशस्वी ठरतात. भारतातील आदिवासी शिक्षणाची स्थिती आणि आव्हाने यांचा अधिक व्यापक आढावा घेऊन हा पेपर सुरू होतो. संशोधनाने आदिवासी समुदायांसाठी शिक्षणाच्या उपलब्धतेत आणि गुणवत्तेत सतत असलेली तफावत अधोरेखित केली आहे, ज्यामुळे त्यांची सामाजिक गतिशीलता आणि आर्थिक संधी मर्यादित होऊ शकतात. या पेपरमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सार्वजनिक शिक्षण व्यवस्था अनेकदा आदिवासी विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक आणि भाषिक गरजा पुरेशा प्रमाणात पूर्ण करण्यात अपयशी ठरली आहे, ज्यामुळे शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे आणि शिक्षणाचे निकाल खराब आहेत. आदिवासी भागात शिक्षणाची उपलब्धता वाढवण्याच्या सरकारी प्रयत्नांना न जुमानता, अनेक आदिवासी समुदायांना शैक्षणिक प्राप्तीमध्ये लक्षणीय अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, पेपर महाराष्ट्रातील पारंपारिक आदिवासी प्रशासनाचा केस स्टडी म्हणून गोटुल प्रणालीचा आढावा घेतो. गोटुल प्रणाली ही एक सांप्रदायिक निर्णय घेणारी संस्था आहे जी महाराष्ट्रातील आदिवासी समुदायांच्या प्रशासनात मध्यवर्ती भूमिका बजावते. ज्यामध्ये  वाद सोडवणे, सांप्रदायिक संसाधनांचे व्यवस्थापन करणे आणि सांस्कृतिक परंपरा जपणे हे काम सोपवले जाते. हा गोटुल प्रणाली कशी विकसित झाली आणि आदिवासी समुदायांमध्ये ती कशी विविध कार्ये करते याचा शोध घेतो. सरकारी धोरणे आणि विकास हस्तक्षेपांमुळे गोटुल प्रणालीवर कसा परिणाम झाला आहे आणि या बाह्य प्रभावांना तोंड देताना तिची स्वायत्तता आणि प्रासंगिकता टिकवून ठेवण्यात तिला कोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागले आहे याचे परीक्षण करतो. गोटुल प्रणाली आणि इतर पारंपारिक आदिवासी शासन मॉडेल्सना भारताच्या व्यापक विकास अजेंड्यात कसे अधिक चांगल्या प्रकारे एकत्रित करता येईल यासाठी धोरणात्मक शिफारसींचा एक संच देऊन हा पेपर संपतो.

"Understanding the Ghotul of Abujh Maria: A Prelude to a Strategy of the Development of the Community"(2014) या संशोधनामध्ये Sahoo Ranju Hasini यांनी अबुझ मारिया जमातीच्या गोटूल शिक्षण प्रणालीला समजून घेऊन त्यामध्ये विकास धोरणांचा हस्तक्षेप यांचे विश्लेषण करतो त्यांचे हे अध्ययन Journal of Studies in Dynamics and Change (JSDC) यामध्ये प्रकाशित झालेले आहे. हा पेपर आदिवासी समुदायातील शैक्षणिक बदलांवर आणि गतिमानतेवर भर देतो. अबुझ मारिया ही बस्तर जिल्यातील आदिवासी जमात आहे. अबुझ मार हा बस्तर जिल्ह्याचा एक वेगळा नैसर्गिक विभाग आहे. मारिया आणि अबुझ मारिया ची एकूण लोकसंख्या २६,६१३ आहे जिथे ४९२७ साक्षर आहेत, २३७ गावे आहेत आणि २३७ गावांपैकी २०५ गावांमध्ये या जमातीचे लोक राहतात आणि ३२ गावे राहण्यायोग्य नाहीत. अबुझ मार हा शब्द हिंदी आणि गोंडी शब्दाचे मिश्रण आहे. हिंदी जग म्हणजे 'अबुझ' म्हणजे रहस्यमय किंवा अज्ञात आणि 'मई' म्हणजे जंगल किंवा टेकड्या. अबुझ मारिया जमाती या प्राचीन संस्थेद्वारे (गोटूल) त्यांची सामाजिक एकता आणि वांशिक ओळख टिकवून ठेवते. कारण पारंपारिक शिक्षणाची जतन करणारे ते एक मध्यम होते. त्यामध्ये मुले आणि मुलींना एकाच ठिकाणी गोटूलमध्ये शिक्षण प्रवाहित केले जात होते. दैनंदिन जीवनातील आवश्यक गोष्टीचे ज्ञान या आदिवासी जमातीतील मुला मुलींना दिले जात होते. परंतु घोटुल व्यवस्थेतील परिवर्तनात महत्वाची भूमिका बजावणारे एजंट आणि संस्था म्हणजे आधुनिक शैक्षणिक संस्था, ब्लॉक पातळीवरील अधिकारी, आरोग्य आणि आयसीडीएस कर्मचारी यासारखे प्रशासकीय अधिकारी आणि पंचायत राज व्यवस्थेच्या लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सहभाग. त्यामुळे त्यांच्या शिक्षण पद्धतीमध्ये परिवर्तन होऊन ते आता शाळेत जाऊन शिक्षण घेतात कारण येणाऱ्या पिढ्यांच्या जीवनमानाचे रक्षण करतांना सध्याचे शिक्षण त्यांना सुधारित वाटते.

**संशोधनाचे उदिष्टे**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P092

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

या पेपरचा मुख्य उद्देश गोंड समाजातील परंपरागत शिक्षणपद्धती आणि त्यातील मुलींच्या शिक्षणाशी निघाडीत मुल्यांचा अभ्यास करणे या अध्ययनाचे उदिष्टे

1. गोंड आदिवासी जमातीतील मुलींच्या पारंपारिक (अनौपचारिक) शिक्षणाला माहिती करून घेणे.
2. गोटूल संस्थेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप समजून घेणे.
3. गोंड मुलींच्या शिक्षणात संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक मूल्यांचे स्थान जाणून घेणे.
4. गोंड समाजातील पारंपारिक शिक्षण प्रणालीचे आजच्या शिक्षण प्रणालीशी तुलनात्मक विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम सामग्रीवर अवलंबून असून विविध पुस्तके, जर्नल्स, संशोधन लेख, वर्तमानपत्र, शासकीय अहवाल यांचा आधार घेण्यात आला. सदर संशोधनाकरिता वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला गेला.

**परिणाम आणि चर्चा**

गोंड जमात ही भारतातील एक प्रमुख आदिवासी जमात आहे. विशेषतः मध्य भारत आणि विदर्भातील भागात वसलेली आहे. परंपरेनुसार गोंड समाजात औपचारिक शिक्षणाची पद्धत विकसित झालेली नव्हती. त्यांच्या शिक्षणाची प्रक्रिया सर्वस्वी अनौपचारिक स्वरूपाची होती जी बहुतेक मौखिक प्रात्यक्षिक आणि रोजच्या जीवनावर अनुभवावर आधारित होती. गोंड समाजामध्ये शैक्षणिक परंपरा अनौपचारिक शिक्षण पद्धतीवर आधारित असून त्यात महिलांचे शिक्षण हे बरेच महत्त्वपूर्ण आहे. गोटूल संस्था लोकगीत व लोककला आणि निसर्गाशी असलेली नाळ ही गोंड समाजाच्या शिक्षण पद्धतीचा भाग आहे.

गोंड समाजामध्ये शिक्षण हे गोटूल द्वारे देण्यात येत असून यामध्ये स्त्री व पुरुष या दोघांचाही समावेश असायचा त्यामुळे गोटूल एक महत्त्वाचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्था आहे असे म्हटले जायचे. ज्यामध्ये खास करून आदिवासी युवक, युवतींना सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक व व्यक्तिगत विकास यांचे शिक्षण दिले जात असे. गोटूलमध्ये मुलांना स्वतंत्र शिक्षण दिले जात होते यामध्ये संस्कार, व्यवहारज्ञान शिस्त तसेच नृत्य, गाणी, लोक परंपरेचे ज्ञान महिलांची शारीरिक स्वच्छता, स्त्रियांचे आरोग्य, सामाजिक जबाबदाऱ्या, पारंपारिकता, कुटुंबातील समज याविषयी मौखिक व अनुभवात्मक शिक्षण दिले जात असे.

गोटूल हे एक युवाविश्रामगृह किंवा छात्रावास असून ते लाकूड, माती व बांबू यासारख्या नैसर्गिक साधनांनी बनलेले असायचे जिथे युवक व युती एकत्र राहत असून युवतींना 'मुटीयारीन' आणि युवकांना 'चेलिक' असे संबोधले जाते. गोटुलमध्ये मुलींच्या शिक्षणाला महत्त्वपूर्ण मानले जाते त्यांना सामाजिक सहकार्य, योग्यता, संभाषण, संवाद नृत्य, गाणे आणि वैवाहिक जीवनाची तयारी शिकवली जाते. मुली तिथे स्वतंत्र जीवन जगतात, तिथे त्यांना समानतेचा संपूर्ण अधिकार असतो. गोटूलमध्ये मुलगा व मुलगी एकमेकांवर प्रेम व्यक्त करतात तेव्हा ते एकत्र राहू लागतात आणि वैवाहिक जीवनाचे शिक्षण घेऊ लागतात. या शिकवणीत भावना समजून घेणे, शारीरिक गरजा पूर्ण करणे यांचा समावेश असतो गोटुलमध्ये स्त्रियांचा सन्मान आणि आदर फार महत्त्वाचा असतो व अनैतिक कृत्यांवर दंड किंवा शिक्षा केली जाते गोटूलमध्ये मुलींची भूमिका समाजातील सहजीवन, समानता, स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक शिक्षण यामध्ये महत्त्वपूर्ण असते.

गोटूलमध्ये पारंपारिक तसेच नैसर्गिक शिक्षण पद्धती वापरल्या जातात जीथे अनुभवी व्यक्ती स्वतःच्या अनुभवांमधून तरुणींना मार्गदर्शन करीत असतात. मुलींचे शिक्षण हे औपचारिक वर्गावर्गात नसून अनौपचारिक असल्यामुळे रोजच्या सामाजिक क्रिया, संवाद तसेच सांस्कृतिक कार्यक्रम अनुभवात्मक असून या शिक्षणामध्ये मुलींना आत्मविश्वास वाढवण्याचा सोबत, काम करण्याचा आणि आपले मत मांडण्याची संधी दिली जाते ज्यामुळे त्याचे नेतृत्व व कौशल्य विकसित होते.

गोंड आदिवासी समाजामध्ये पारंपारिक धार्मिक सण (पोलो,नवाखाई) महत्वपूर्ण शैक्षणिक साधन म्हणून कार्य करतात. यामधून तरुण मुली अनौपचारिक शिक्षण, निसर्गाशी जोडलेले अनुभवावर आधारित ज्ञान घेत असतात. पोलो मधून गोंड आदिवासी महिला सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्य, सामुहिक जबाबदारी आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे शिक्षण घेते. यामुळे गोंड तरुण मुली मुल्याधिष्ठित शिक्षण घेत असतात. नवाखाई ही परंपरा कृषीवर आधारित ज्ञान असून अन्नसुरक्षा, उपजीविका कौशल्य आणि निसर्गाविषयी कृतज्ञतेची भावना गोंड तरुण मुलींमध्ये दिसून येते. ज्यामुळे तरुण मुलींमध्ये आर्थिक व जीवनोपयोगी शिक्षण रुजते.

गोंड आदिवासी मुलींना पारंपारिक काळात स्थानिक संस्कृती पर्यावरण औषध शास्त्र कला सामाजिक व कौटुंबिक जीवन यावर आधारित संपूर्ण आणि व्यावहारिक शिक्षण दिले जात असे ज्यामुळे त्यांचा सामाजिक सांस्कृतिक विकास निश्चित केला जात होता पारंपारिक शिक्षण हे अनुभवात्मक आणि समुदायाभिमुख असायचे त्यामुळे शाळेची अधिकृत व्यवस्था नसताना सुद्धा मुलींना सहज ज्ञान हस्तगत व्हायचे आपल्या समुदायाला

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P092
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

आवश्यक असेल अशा प्रकारचे शिक्षण त्यांना देण्यात येत असे. गोंड आदिवासी मुलींना गत काळात जडीबुटीचे प्रशिक्षण मुख्यत्वे करून 'गोटूल' नावाच्या प्राचीन शिक्षणात पद्धतीमार्फत दिले जात असे या गोटूल शिक्षणामधून मुलींना फक्त सामान्य शालेय शिक्षण नव्हे तर पारंपरिक औषधी वनस्पतीचा उपयोग व जडीबुटींचा अभ्यास पर्यावरणीय समज, निर्णय क्षमतांचा विकास आणि आत्मनिर्भरतेसाठी आवश्यक जीवन कौशल्य शिकवले जात असे. गोंड समुदाय विशेषता: कोईतुर गोंडाच्या "कोया पुनेम" नावाच्या ग्रंथाद्वारे त्यांच्या जीवनशैली आणि प्रकृतीचा (जडबुटींचा) अभ्यास केला जात असे. ज्यामुळे जडीबुटींचा उपचार व वापर या क्षेत्रात त्या कारागीर म्हणून आपल्या समुदायासाठी उपयोगी पडू शकतील.

गोंड आदिवासी मुलींना पारंपारिक काळात दाई अर्थात प्रस्तुती सहाय्यक प्रशिक्षण मुख्यतः अनुभवावर आणि समुदायातील वृद्ध स्त्रियांच्या मार्गदर्शनावर आधारित दिले जात असे. गोंड समुदायातील प्रसुती संदर्भात ज्ञान आणि कौशल्य तोंडी आणि प्रत्यक्ष अनुभवाने पुढील पिढीला हस्तांतरित केली जात असतात. दाई प्रशिक्षणामध्ये गर्भधारणेची काळजी घेणे, प्रसुती पूर्व आणि प्रसुती नंतरची काळजी, नैसर्गिक औषध वनस्पतींचा वापर, प्रसुती संबंधित तंत्र आणि नवजात बाळाची देखभाल या बाबींचा समावेश असे. या ज्ञानाचे शिक्षण मुख्यतः गावातील दाई किंवा वृद्ध स्त्रिया नव्याने दाई होणाऱ्या मुलींना शिकवायच्या आणि त्या मुलींची मदत प्रसुतीच्या वेळी तातडीच्या वेळी होत असे. गोंड आदिवासी समाजात दाई हे सामाजिक सांस्कृतिक आणि अध्यात्मिक दृष्टिकोनातून मानले जात असे. प्रसुती संबंधी विविध विधी, पूजा आणि नैसर्गिक उपचार यासाठी विशेष संस्कार पार पाडले जात असे. निसर्ग व पर्यावरणाशी जोडलेले तसेच धार्मिक श्रद्धांवर आधारित हे प्रशिक्षण गर्भधारणेपासून ते मुल जन्माला पर्यंतच्या काळजीसाठी ठरवलेले होते. म्हणजेच गोंड आदिवासी मुलींना दाईचे प्रशिक्षण त्याच कौटुंबिक सामाजिक वातावरण, तोंडी अनुभवा मधून दिले जायचे हे विशेष मार्गदर्शन आणि धर्मपरंपरेवर आधारित होते. जे समुदायाच्या स्वावलंबनासाठी आणि प्रकृतीपण आधारित स्वास्थ्यासाठी महत्त्वाचे होते.

गोटूल शिक्षण ही एक समृद्ध सांस्कृतिक, शैक्षणिक पद्धत असून ती मुलींना आत्मविश्वास, सामाजिक जबाबदारी आणि जीवनशैली शिकवण्यासाठी उपयुक्त आहे मात्र आधुनिक शिक्षणाची गरज मुलींना रोजगार, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी अनिवार्य आहे. बाह्य समाजाच्या आधुनिक नैतिक मूल्यांच्या प्रभावाने आणि शिक्षणाच्या नव्या पद्धतीच्या आगमनामुळे गोंड जमातीतील शिक्षण पद्धती बदलत चाललेली आहे. त्यांनी नवीन शिक्षण पद्धतीचा स्वीकार केलेला आहे त्यामुळे गोटूलची प्रथा हळूहळू कमी होत जाऊन संपुष्टात येत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारत सरकारने आदिवासी समाजाचा विकास हा राष्ट्रीय उद्दिष्ट ठरविला व शिक्षण हे सर्वांसाठी आवश्यक हक्क आहे अशी धारणा निर्माण झाली यानंतर आदिवासी मुली शिक्षणात प्रवेश करू लागल्या. आधुनिक शिक्षण प्रणाली ही मानवतावाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टीकोन, समता आणि सर्जनशीलता या मुलभूत मुल्यांवर आधारित असून ही प्रणाली केवेल ज्ञान देत नाही तर एक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनवितो.

## निष्कर्ष

आदिवासी समाजातील मुलींमध्ये पारंपारिक मूल्यव्यवस्थेतील शिक्षण आणि आधुनिक शिक्षण प्रणालीतील मूल्यव्यवस्था यांच्यामध्ये संघर्ष दिसून येतो. कारण आदिवासी शिक्षण मूल्य सहजीवन, एकोपा, समूहभावना आणि परस्पर सहकार्य हे शिकविते तर आधुनिक शिक्षण यश, स्पर्धा, गुण आणि पदोन्नती यावर भर दिला जातो आदिवासी गोंड मुली शिक्षणात पुढे येतात पण स्पर्धात्मक दृष्टिकोनामुळे पारस्पारिक सहकार्याच्या भावनेमध्ये कमतरता निर्माण होते. आदिवासी शैक्षणिक मूल्य निसर्ग व पर्यावरणाशी सुसंवाद राखतो तर आधुनिक शैक्षणिक मूल्य भौतिक प्रगती व तंत्रज्ञान आणि उपभोगावर भर देतात त्यामुळे निसर्गाशी असलेले भावनिक नाते कमी होते शाळेत स्थानिक ज्ञानाला कमी महत्व दिले जाते ज्यामुळे आदिवासी मुली आपली परंपरा विसरू लागतात. "आम्ही" च्या ऐवजी "मी" हा विचार रुजतो. धार्मिक परंपरा आणि वैज्ञानिक विचारसरणी यामध्ये द्वंद्व निर्माण होतो. आदिवासी मुलींसाठी आधुनिक शिक्षण प्रणाली ही नव्या संधीचे द्वार आहे परंतु तिच्यात पारंपारिक मुल्यांचा समावेश टिकविणे अत्यावश्यक आहे. आधुनिक शिक्षणाने केवळ नोकरीसाठी नव्हे तर संवेदनशील, संस्कृतीनिष्ठ आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक आदिवासी महिला घडवाव्यात. म्हणूनच शिक्षणामध्ये परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधने गरजेचे आहे.

## संदर्भ

Bourdieu, P.(1984). Asocial critique of the Judgement of Test , Harvard University Press. 11-63.

Durkheim, Emile (1956) Education and sociology, Collier-Macmillan Limited, London. 70-71.

Elwin,Verrier(1947).The Muria and their Ghotul, Oxford university Press.16-20.
Mehta,B.H.(1976). Gonds of the central Indian Highlands, concept Publishing Company, New Delhi. 455 – 460.
Ministry of Tribal Affairs, Govt. of India (2020). Report on Tribal Education in India, Government of India, https://tribal.nic.in
Oakley, A. (1972). Sex, Gender and Society. Temple Smith Ltd. London. 116.
Rath, Govind Chandra (2006). Tribal Development in India: The Contemporary Debate, Sage Publication
Kumare, Swapnil S, (2024), "Strengthening Tribal Governance: A case Study of the Gotul System in Maharastra, India" Galaxy: International Multidisciplinary Research Journal Vol.13, Issue – V, August 2024 ISSN: 2278-9529
Sahoo, R. H. (2014). Understanding the Ghotul of Abujh Maria: A Prelude to a Strategy of the Development of the Community. Journal of Studies in Dynamics and Change (JSDC), 1(4), SP 1 – SP 6.
XaXa, Virginius(2005). Politics of Identity and Tribal Education, Economic and political weekly (EPW), Vol.40,No.30.
चौधरी, एस. एन & मिश्रा मनीष (2012). आदिवासी विकास उपलब्धींयाँ एवं चुनौतियाँ, concept publishing company PV. LTD, New Delhi- 110059. 123-124.